# रक्षाबंधनानिमित्त

प्रिय दादा,

बंधन हे प्रेमाचे
बंधन हे मायेचे
असेच फुलत राहू दे
नाते तुझे नी माझे

तुझी बहीण श्वेता

ऋणानुबंधाचा बंध
बांध ह्या हातावर
सार्थ ठरवीन जीवन
करून तुझे रक्षण

राजेश

तू दूर तेथे कोठेतरी
क्षणोक्षणी मज येते तुझी आठवण
रक्षाबंधनाच्या दिवसासाठींच
केली मी तुझ्या आठवणीची साठवण

श्याम

पळणाऱ्या मुंबईत पळतच घेतलीय,
रेडिमेड राखी पाठवलीय
भरजरी पितांबर फाडणारी भावभक्ति
या रेशीम धाग्यात बांधलीय

मुग्धा

तुझ्यासाठी लिहीताना
नक्की कसलं भान ठेवावं
कोमल हळुवार आठवणींचे, की
तुझ्यामाझ्या सुंदर नात्याचे,
त्या खोडकर, खेळकर क्षणांचे
तुझ्या आठवणीने मनांत आंवढा मग दाटतो,
ह्या आठवणींच्या पाऊलखुणांवर
न संपणारा अनामिक आनंद
तुझ्या मायेचा, प्रेमाचा, करुणेचा सागर अनुभवण्यासाठी
येणाऱ्या रक्षाबंधनाची आतुरतेने वाट पहायची

सुप्रिया

नसे बंधू म्हणून आम्ही
करीत नाही खंत
पाठोपाठच्या आम्ही दोघी बहिणी
आहोत भाग्यवंत
एकमेकींना राखी बांधून
करूं साजरे रक्षाबंधन
नसूं आम्ही अबला
हीच ग्वाही एकमेकींना

स्मिता व अनघा

प्रिय भाऊस,

तुझ्या माझ्या नात्याची
शपथ तुला या राखीची
न्यायाने वाट चाल जीवनाची
शान राख आपल्या देशाची ....... गीता

नातं हे आयुष्यभराचं असतं
कसं टिकवायचं हे प्रत्येकाने ठरवायचं असतं
बहीण-भाऊ असो,मैत्रीण असो वा मित्र
नातं युगायुगाचं असतं
राखी बांधून मला बहीण आहे हे सांगयच नसतं
प्रत्येक भावाने आपल्या कर्तव्याच पालन करायच असतं
म्हणूनच बहीण ही भावाला आईसारखीच असते

ज्ञानेश्वर

प्रिय वंदना,

आकाशांत खूप चांदण्या आहेत
पण माझ्या बहिणी सारखी कोणी नाहीं
आणि जगांत प्रत्येक बहिणीला भाऊ आहेत
पण माझ्या सारखा भाऊ फक्त आहे
माझ्या बहिणीकडेच !!

तुझा दादा

भाऊराया,

कधी हसलो,कधी रुसलो,
आठवणी त्या बालपणीच्या
राखीच्या रेशमाच्या गांठी न कधी सुटायच्या
भाऊ-बहिणीच्या प्रेमाची नाती न कधी तुटायची

भाग्यश्री

प्रिय बहीण रेश्मा,

प्रार्थना करतो देवाला
सुखी ठेव माझ्या बहिणीला
दुख्ख तिचे येऊ दे माझ्या वाट्याला
आयुष्य माझे लाभू दे माझ्या बहिणील

तुझा भाऊ आकाश

ताई तुला रक्षाबंधनाच्या शुभेच्छा
अखंड सुख समृद्धी लाभो हीच सदिच्छा!!

अक्षय

मला वाटतं सर्वच धर्मातून हा सण साजरा व्हावा.हा कोणत्या धर्माचा आहे हे न पहाता त्यामागची उदात्त भावना लक्षांत घ्यावी. बहिणभावाच्या नात्याचे बंधन देशधर्माच्या बंधनापासून अलिप्त असते. ही राखी विश्वबंधुत्वाचा संदेश राहो

मोना रॉड्रीग्ज

संग्रहिका
सौ. आशा जोशी